**पुणे शहरांत सोन्याचे दुकानात जावुन दुकानदारांची नजर चुकवुन,चोरी करणारे करणारे सोलापुर भागांतील सराईत महिला आरोपींना गुन्हे शाखेकडील युनिट-५ विभागाने केले जेरबंद.**

---

दिघी पो. स्टे. गुन्हा रजि.नं.१९९/२०१७ भा.दं.वि.क.३८०,३४,मधील नवकार ज्वेलर्स दुकानांत केलेली सोन्याचे दागिनेची चोरी तसेच बिबवेवाडी पोलीस ठाणे ३४०/२०१७ भा.दं.वि.कलम- ३८०,३४ मधील राठोड ज्वेलर्स, बिबवेवाडी पुणे येथे सोने चांदी विक्रीचे दुकानात तीन अनोळखी महिला खरेदीच्या बहाण्याने दुकानात येवुन नजर चुकवुन सोन्याचे टॉप्स ,झुमके,दागिने चोरी झालेचे गुन्हे दाखल असुन त्यामधील महिला आरोपींचे सी.सी.टि.व्ही.फुटेज प्रसारीत झाले होते त्याचे अनुशंगाने सपोनिरी.युवराज नांद्रे,व पो.हवा.भरत रणसिंग यांनी सदरचे महिला आरोपींची माहिती गोळा केली होती.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा,युनिट-५ पुणे शहर करीत असताना सपोनिरी. युवराज नांद्रे व पो.हवा.भरत रणसिंग यांनी बातमी काढुन मा.प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे सुचना व आदेशा प्रमाणे सापळा लावुन महिला नामे- १) श्रीमती कल्पना अंकुश कांबळे,वय-४५ वर्षे रा.स.नं.१०६ गोसावी वस्ती, पिंपळाचे झाडाखाली, हडपसर पुणे मुळगांव मु.पो.रायगाव ता.करमाळा जि.सोलापुर २) सौ.चंपा आप्पा जाधव,वय-४५ वर्षे सध्या रा.सदर व रा.मु.पो. रेणुकानगर,यल्लम्मा मंदिराजवळ ता.करमाळा जि.सोलापुर ३) अफरोगा निवृत्ती जाधव वय-४८ वर्षे सध्या रा.सदर व मु.पो.पोतर ता.करमाळा जि.सोलापुर यांना महिला स्टाफकरवी ताब्यांत घेतले व विश्वासांत घेवुन सखोल व कौशल्यपुर्वक तपास करता वरील नमुद अटक महिला आरोपी व त्यांचा फरारी साथीदार कृष्णा शहाजी पवार, रा. मु.पो. रायगाव ता.करमाळा जि.सोलापूर यांनी मिळुन पुणे शहरांतील १)येरवडा पो.स्टे. २)शिवाजीनगर पो.स्टे. ३) बंडगार्डन पो.स्टे. ४) फरासखाना पो.स्टे. ५) स्वारगेट पो.स्टे. ६) दिघी पो.स्टे. ७) बिबवेवाडी पो.स्टे. असे एकूण ०७ गुन्हे उघडकीस येवुन त्यातील चोरीस गेली **रोख रक्कम व सोन्याचे दागिने** असे सर्व मिळुन **०१,१२,२००/- चा** मुददेमाल जप्त करणेत आला आहे.

यातील अटक महिला आरोपी व त्यांचा फरारी साथीदार कृष्णा शहाजी पवार हे सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वीही अशा प्रकारच्या चो-या केल्याचे गुन्हे नोंद आहेत. दाखल गुन्हयातील चोरलेले सोन्याचे दागिने हे यातील आरोपी यांनी त्यांचे अजुन पाहिजे साथीदार नातेवाईक नामे- कुसुम रेटे व दादा रेटे रा.जामखेड,नगर यांना विक्री करण्या करीता दिले असलेचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री.पंकज डहाणे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री.संजय निकम यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी, श्री.दत्ता चव्हाण, सपो.निरी,युवराज नांद्रे, पो.उ.निरी. अकील शेख, स.पो.फौज.लक्ष्मण शिंदे,पो.हवा.संतोष मोहिते.माणिक पवार, प्रविण शिंदे, राजेश रणसिंग,सचिन घोलप,सिध्दराम कोळी,केरबा गलांडे,पो.ना.अमजद पठाण,महेश वाघमारे, प्रविण काळभोर, गणेश बाजारे, अंकुश जोगदंडे, नामदेव आंगज चापोशि संजयकुमार दळवी व गुन्हेशाखेकडील महिला स्नेहल जाधव,रुपाली चांदगुडे,अनुराधा ठोंबरे,ज्योती काचळे यांनी कामगिरी केलेली आहे.

**सदरच्या गुन्हयांचा तपास युनिट-५ कडील .पोलीस उप-निरिक्षक अकिल शेख हे करीत आहेत.**